# अर्पण पत्रिका

''ज्यांनी मला
माणसांच्या समाजात
माणूस म्हणून जगायला शिकवलं
त्या आई व माई यांना
अर्पण...!''

– अरूण जगदाळे

# ऋणनिर्देश

''प्रा. म.द. हातकणंगलेकर यांच्या 'उघडझाप' या आत्मपर आठवणी संग्रहाचा अभ्यास'' या विषयावरील लघुप्रबंधाचे एम.फिल्. (मराठी) पदवीसाठी संशोधन व लेखन करताना या संशोधन कार्यात 'ज्ञात-अज्ञात' तसेच जाणते-अजाणतेपणी अनेक व्यक्तिंचे जिव्हाळ्याचे व आपलेपणाचे सहकार्य लाभलेले आहे.

आज मितीस माझ्या हातून जे संशोधनाचे कार्य होत आहे ते केवळ आणि केवळ माझी दैवततल्य माता सौ. सावित्री जगदाळे व वडील श्री. वसंतराव जगदाळे या दोघांच्यामुळे. वडिलांच्या तुटपुंज्या पगारामध्ये अतिशय नियोजनबद्ध फाटक्या संसाराचा गाडा ओढत असतानाच आम्हा भावंडाना उच्चशिक्षण मिळावे यासाठी अहोरात्र खस्ता सहन करत चंदनाप्रमाणे जीवन जगणारी माझी आई. स्वत: फारसे शिक्षण न घेतलेली मात्र 'माझ्या पोरानं गावामधी कुणीबी शिकलं नाही एवढं शिक्षण त्यानं घ्यावं' ही गरूड झेपेची अपेक्षा आपल्या छातीशी कवटाळून काटेरी वाट तुडवत जगणारी. मी, बहिणाबाई चौधरींचा अभ्यास करताना ती दिसायला कशी असेल ? असा प्रश्न माझ्या मनामध्ये वारंवार निर्माण होत असे. तेव्हा तिच्या काव्यरचनेवरून तिचे रूप मी डोळेबंद करून आठवण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्या प्रत्येक वेळी माझ्या चक्षुसमोर माझ्या जन्मदात्या आईचीच मूर्ती उभी राहात असे. या गोष्टीचा उलघडा आज पावेतो मला झालेला नाही. हेच तिचे बहिणाबाईचं रूप मला जगण्यास, शिकण्यास व समाजकार्य करण्यास हत्तीचं बळ देऊन जाते. त्याच माझ्या आईच्या चरणी हे माझे यथार्थ जीवन निर्माल्य म्हणून अर्पण करीतो.

मी आज ज्या जागेवरती उभा आहे, त्या जागेचा खरा मानकरी किंवा अधिकारी कोण असेल तर ती माझी मोठी बहिण वंदना. जिला आम्ही सारेजणच 'माई' म्हणतो. म.द. हातकणंगलेकरांच्या 'उघडझाप' मध्ये लेखकांनी आपल्या मोठ्या भावाच्या मनातील अपेक्षा व्यक्त करून दाखवलेली आहे. की आपल्या भावाने म्हणजे म.द. हातकणंगलेकरांनी मोठ्या शाळेत उच्चदर्जाचे शिक्षण घ्यावे. याच विचाराने जगणारी, कुटुंबाचा विरोध, रोष सहन करणारी, आपले शिक्षण आपणास अर्धवट मध्येच सोडून द्यावे लागले तरी चालेल मात्र माझ्या भावाने शिकले पाहिजे. अशा विचाराने जगणारी 'माई' रूपातील 'आई'.

याबरोबर आम्हा भावंडामध्ये सर्वात मोठी असणारी, माझी बहिण 'सुजाता'. जिच्या पावलावर पाऊल ठेवत आम्ही भावंडं शिक्षणरूपी महासागरामध्ये पोहायला शिकलो. शिक्षणाची फारशी विचारधारा घरामध्ये नसताना जिनं या शिक्षणरूपी विचारधारेचा प्रवाह घरामध्ये सुरू केला. अशी ती सर्वांनाच आपल्या मायेच्या विचारांना आपल्या पंखाखाली सामावून घेणारी सर्वांचीच 'ताई'. जिचे विचार माझ्या विचारांशी कधीही जुळले नाहीत, ज्या विचारामध्ये सदैव 'दोन धृवावरची दोन टोके' अशी परिस्थिती निर्माण झालेली असतानाही मनोमन माझ्या शिक्षणरूपी जीवनासाठी ईश्वराकडे सदैव साकडं घालणारी माझी बहिण 'संगीता'. या सर्वांचाच इथे मी मन:पूर्वक ऋणी आहे.

माझ्या जीवनामध्ये मला मिळालेल्या वेगवेगळ्या क्षेत्रातील यशामागे ज्या ज्या जिवाभावाच्या व्यक्तिंचे सहकार्य लाभलेलं आहे त्यांचा उल्लेख करणे मी माझं कर्तव्य समजतो.

अशा व्यक्तिंमध्ये प्रामुख्याने उल्लेख करावे असे ते माझे मार्गदर्शक गुरूवर्य प्रा. डॉ. मोहन पाटील (सर). डॉ. मोहन पाटील सरांचे लाभलेले सहकार्य, वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन शब्दात व्यक्त करणे मला अवघड आहे. संशोधनाचे काम सुरू असताना माझ्या हातून वारंवार होत असणाऱ्या चुका, माझ्या अडचणी व माझा आळस या सर्वावर मात करण्यास सरांनी मला शिकवले. त्याबरोबर त्यांनी मला सावरून घेत हे संशोधनाचे काम पूर्णत्वास नेले. त्यामुळेच हा लघुप्रबंध आपणासमोर मी सादर करू शकलो असे या ठिकाणी मी प्रामाणिकपणे नमूद करू इच्छितो. माझ्या जीवनामध्ये वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये सरांच्याकडून मिळालेले मार्गदर्शन, विचारांची शिदोरी आयुष्यातल्या प्रत्येक वळणावरती माझ्या जीवनरूपी नौकेस तारणारी असेल ही माझी धारणा आहे. संशोधनाचे कार्य माझ्या हातून पूर्णत्वास जाईल की नाही? अशी भीती मनामध्ये असताना जो आत्मविश्वास माझ्या मनामध्ये सरांनी निर्माण केला त्याचेच फलित म्हणजे हा 'लघुप्रबंध' होय. सरांच्या या ऋणाच्या बंधनात राहाण्यास मला सदैव आनंद वाटेल.

माझे शिक्षण सुरू असताना ज्यांनी मला प्रत्यक्ष कधीच वर्गामध्ये शिकवले नसले तरी माझे एम.ए. बी.एड्., सेट-नेट, एम.फिल.चे शिक्षण सुरू असताना मला जेव्हा अडचण येईल त्या त्या वेळेस आपल्या स्वत:च्या अडचणी आपले काम बाजूला ठेवून मला नेहमीच मदत

करणारे प्रा. प्रवीण चंदनशिवे सर मला नेहमीच माझ्या 'गुरू'प्रमाणे वाटतात. ज्यांच्या वारंवार सुचनेमुळे किंवा ज्यांच्या आंतरिक तळमळीमुळे असेल, मी आज संशोधनाकडे वळलो ते माझे गुरू प्रा. नितीन सावंत सर. वेळप्रसंगी सरांनी मला रागाचे चार शब्द बोलले असतील मात्र ते त्यांच्या मनामध्ये असणारी माझ्याविषयीची कणवच म्हणावी लागेल. असेच आत्मियतेने व जिव्हाळ्याने ज्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन केले ते प्रा. वाय. एम. चव्हाण सर. ज्यांच्या वेळोवेळी होणाऱ्या सहयोगाने व मार्गदर्शनाने विद्यापीठीय व त्या नंतरच्या शिक्षणामध्ये मला भरघोस यश संपादन करता आले ते प्रा. गोमटेश्वर पाटील सर. जे सदैव मला एका विद्यापीठासमान भासतात.

तसेच प्रा. ए. टी. चौगुले सर प्रा. तानाजी देशमुख सर, प्रा. गिरीश मोरे सर, प्रा. डॉ. सौ. सुनीता लेंगडे मॅडम, व प्रा. डॉ. सौ. रोहिनी तुकदेव मॅडम तसेच याचसारख्या अनेक शिक्षकांचे सहकार्य पावलोपावली मला लाभले. त्यांच्या या सहकार्यानेच हा लघुप्रबंध पूर्णत्वास साकारला असे म्हणावेसे वाटते.

माझ्या आयुष्यामध्ये वयाने माझ्यापेक्षा मोठे असले तरीही मित्रासमान भासणारे प्रा. सुरेश भाटीया, प्रा. कर्णिक सर, प्रा. मोहन कळेकर, शंकरराव कुलकर्णी, संभाजीराव भिडे (गुरूजी) यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरलेले आहे.

ज्यांना मी गुरूबंधू मानतो ते प्रसाद मुनसे, यांचेही या संशोधाच्याच नव्हे तर जीवनामध्ये उद्‌भवणाऱ्या लक्ष लक्ष अडचणींच्यावेळी अनमोल अशी बंधुरूपी सहकार्याची जी सोबत मिळाली ती व्यक्त करणे म्हणजे त्यांच्या ऋणामधून मुक्त होणे असे मला वाटते. यामुळे ते लिहिणे मी टाळतो आहे. माझी एम.फिल. ची नोंदणी झाल्यापासून ते हा प्रबंध सादर करेपर्यंत सहकार्य करणारी व माझ्या सोबत संशोधन करणारी कु. सुवर्णा जाधव त्याबरोबरच राजेश जगदाळे, संदिप जगदाळे, मिलींद जगदाळे, दिलीप पोवार, बबनराव यादव, राजू सुर्यवंशी, शेखर पाटील, दिपक पोवार, प्रविण जगदाळे, विजय शिणगारे, श्रीशाम कांबळे याही मित्रांचे सहकार्य मला वेळोवेळी फलदायी ठरत आलेले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहबे खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सेवक वर्ग, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर मधील ग्रंथालय, गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय

मधील ग्रंथालय, विलिंग्डन कॉलेजमधील ग्रंथालय व शाहू वाचनालय शिरोळ या सर्वांमधील पुस्तकांचा झालेला पुरवठा यामुळेच हे संशोधनाचे कार्य पूर्ण झाले आहे असे मला वाटते.

प्रबंध कॉम्प्युटर डी.टी.पी. करण्याचे काम अचूक आणि वेळेत पूर्ण करून देण्याचे काम ज्यांनी केले ते दिपक कोष्टी. त्यांचेही चांगले सहकार्य मला लाभले.

अशा अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तिंच्या प्रेरणा व सहकार्याची प्रांजळ, निस्वार्थी भूमिका सदैव माझ्या पाठीशी होती. या सर्वांचे प्रोत्साहन, आशीर्वाद, सहकार्य यामुळेच हा लघु-प्रबंध पूर्तीचा आनंद, कृतार्थतेचे समाधान देतो आहे !

धन्यवाद !

**- श्री. अरूण जगदाळे**